# कोर्ट विद्यमान श्रीमती प्रियदर्शनी बोरकर, तहसिलदार हिंगणा यांचे महसूल न्यायालय हिंगणा

रा.मा.क्र23 /एन.ए.पी.-34/2021-22
मौजा-वानाडोंगरी, प.ह.नं. 46,
तालुका-हिंगणा, जि. नागपूर

## परिशिष्ट "ब"

**महाराष्ट्र जमिन महसूल संहीता 1966 चे कलम 42 अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अश्या जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाची**

## सनद

( पारीत दिनांक -२८ मार्च 2022)

ज्याअर्थी अर्जदार श्री. रितेश राधेश्याम शर्मा, रा. नागपूर यांनी मौजा- वानाडोंगरी, सा. क्र. 46 येथील सर्व्हे क्र. 22/1 आराजी 1.62 हे. आर या जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ अनधिकृत अभिन्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 47(ब) व महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण ) (सुधारीत) अधिनियम 2021 अन्वये छाननी शुल्क, प्रशमन शुल्क व विकास आकारचा भरणा करुन नियमानुकुल/नियमितीकरण करणेबाबत (नियोजन प्राधिकरण) मुख्याधिकारी, नगर परिषद, वानाडोंगरी यांचेकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर परिषद, वानाडोंगरी (नियोजन प्राधिकरण ) यांनी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण ) (सुधारीत) अधिनियम 2021 चे कलम 5(1) अन्वये निवासी प्रयोजनार्थ अनधिकृत अभिन्यास/लेआऊट पत्र क्र. पत्र क्र.न.प.वा./न.र.वि./भु.नियमी/1298 दिनांक 24/02/2022 अन्वये नियमितीकरण करुन बांधकाम/विकास परवानगी दिली आहे.

ज्याअर्थी सदरहु नियमितीकरण पत्राची व नियमानुकुल/नियमितीकरण अभिन्यास नकाशाची प्रत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे सुधारीत कलम 42 अ अन्वये "परिशिष्ट ब" मध्ये सनद निर्गमित करणेकरीता या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर परिषद वानाडोंगरी यांनी नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेला अभिन्यास नकाशा या सनदेबाबत सोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| AREA STATEMENT | | | |
|---|---|---|---|
| 1 | TOTAL AREA OF UNDER LAYOUT | 16200.00 | SQ.MT |
| 2 | TOTAL AREA UNDER PLOT | 10134.16 | SQ.MT |
| 3 | AREA UNDER OPEN SPACE AND AMENITY | 1623.47 | SQ.MT |
| 4 | TOTAL AREA UNDER ROAD | 4417.37 | SQ.MT |

आणि ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहीतेच्या कलम 47 अ नुसार देय रुपांतर कराची व नमुद निवासी अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ 1.62 हे.आर (16200 चौ.मी.) निवासी प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र 16200 चौ. मी. ला 0.10 पैसे प्रति चौ.मी. याप्रमाणे एकुण अकृषक महसुल कर रु. 14580/- परावर्तीत कर अकृषक साऱ्याच्या 5 पट म्हणजेच रु. 8100/- असे एकुण रु. 22680/- चालान क्र. MH015520174 दिनाक 28/03/2022 रोजी शासन खजिना दाखल केलेली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहीतेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तीना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरण/नियमानुकुल परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला निवासी अकृषिक वापरापोटी उक्त सहिंतेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1) आकारणी : उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक 31 जुलै, 2022 रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये 0.10 प्रती चौ. मी. प्रमाणे रूपये 1620/- या दराने परीगणित होणारी वार्षिक

आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल. अशी सुधारीत आकारणी देईल.

2) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

3) वरीलप्रमाणे नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकारणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमीत झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराचे क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरण कडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसाच्या आत तहसिलदार यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहिल.

4) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास तहसिलदार यास, उक्त संहितेच्या अन्वये तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीअन्वये जी भरण्यास उपयोग करता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट्र कलम (2) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटादार यांच्या वहिवाटीत्त असण्याचे चालू ठेवता येईल.

5) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा यांचे कडून मोजणी करून घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.त्यांची साक्ष म्हणुन तहसिलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक 29/03 /2021 रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)
( श्री. रितेश राधेश्याम शर्मा)

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री . हितेन्द्र डी. शर्मा

ब ) श्री . संजय भाऊ शेळके

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री . हितेन्द्र डी. शर्मा

ब) श्री . संजय भाऊ शेळके

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: श्री. रितेश राधेश्याम शर्मा यांनी स्वाक्षरी केली, ती व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्यानी या ठिकाणी आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केलेली आहे.

तहसिलदार
सत्यमेव जयते
हिंगणा

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसिलदार, हिंगणा

प्रतिलीपी : -

1) तलाठी सा . क्र . 46 मौजा - वानाडोंगरी यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.
2) अर्जदार श्री. रितेश राधेश्याम शर्मा, रा. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

बोरकर 29/3/22
तहसिलदार, हिंगणा
हिंगणा.